**आर बी आय/२००५-०६/२०४**
**डीबीओडी. क्र. एलइजी . बीसी. ४४/०९.०७.००५/२००५-०६**

११ नोव्हेंबर, २००५

प्रति,
सर्व अनुसूचित वाणिज्य बँका
(क्षेत्रीय ग्रामीण बँका सोडून)

प्रिय महोदय,

**वित्तीय समावेश**

वर्ष २००५-०६ च्या वार्षिक धोरण निवेदनाच्या मध्यावधी समीक्षेतील पॅराग्राफ ९६ चे अवलोकन करावे.

२. एप्रिल २००५ च्या वार्षिक धोरणात हे कबूल केले आहे की, बँकींग चालिरीतींचा कल लोकसंस्थेतील बराचसा भाग आकर्षित करण्याऐवजी तो वगळण्याकडेच असतो. पण तरीही बँकांनी त्याच्या सध्याच्या चालीरीती पडताळून, त्यांच्यात व बँकांच्या उद्दिष्टांमध्ये वित्तीय समावेश साधण्यासाठी सुसंगती आणावी. बऱ्याच बँकांमध्ये कमीत कमी शिल्लकीची आवश्यकता व शुल्क आकारणी (जरी त्यांच्या बरोबर अनेक निःशुल्क सेवा जोडलेल्या असल्यातरी), लोकसंख्येतील बऱ्याच लोकांना त्या बँकांमध्ये नवीन खाते उघडण्यापासून/खाते चालू ठेवण्यापासून परावृत करतात.

३. या संदर्भात, जास्तीत जास्त वित्तीय सेवा प्रदान करण्याचे उद्दिष्ट गाठण्यासाठी बँकांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी मूलभूत बँकींग "नो फ्रिल्स" खाती , शून्य किंवा कमीत कमी शिल्लक व शुल्क आकारणी ची आवश्यकता ठेवून, समाजातील बऱ्याच लोकांना उपलब्ध करुन द्यावीत. अशा खात्यांचे प्रकार व त्यातील व्यवहार हा सीमीत ठेवावा. परंतु त्याची ग्राहकांना पूर्व कल्पना द्यावी. सर्व बँकाना सूचित केले जात आहे की, त्यांनी नो फ्रिल्स खात्याच्या सुविधेच्या उपलब्धतेची पुरेशी प्रसिध्दी द्यावी. तसेच वेबसाईटवरही या सुविधेची पारदर्शक रीतीने जाहीरात करावी.

४. अशा तऱ्हेने उघडलेल्या खात्यांची संख्या आम्हाला त्रैमासिक आधारावर कळवावी.

५. या विषयावर ताबडतोब कार्यवाही करुन आम्हाला या संदर्भातील अनुपालन एक महिन्यात कळवावे.

६. कृपया पोच द्यावी.

आपला विश्वासु
हस्ताक्षर
(प्रशांत सरन)
मुख्य महा व्यवस्थापक